BAJAJ FINSERV

9 July 2026

| To<br>Corporate Relations Department.<br>**BSE Limited**<br>1st Floor, New Trading Ring,<br>Rotunda Building, P J Tower,<br>Dalal Street, Fort,<br>Mumbai 400 001 | To<br>Corporate Listing Department.<br>**National Stock Exchange of India Ltd**<br>Exchange Plaza, 5th Floor<br>Plot No.C-1, G Block,<br>Bandra-Kurla Complex,<br>Bandra (East), Mumbai 400 051 |
|---|---|
| **BSE Code: 532978** | **NSE Code: BAJAJFINSV** |

Dear Sir/Madam,

**Sub.: Newspaper Advertisement - Disclosure under Regulation 30 of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015 (the 'SEBI Listing Regulations')**

Pursuant to Regulation 30 of the SEBI Listing Regulations, we enclose herewith copy of the advertisements published in Financial Express – all editions (English) and Kesari – Pune edition (Marathi), today on 9 July 2026, concerning 19th Annual General Meeting to be held on Friday, 31 July 2026 at 12:15 p.m. through Video Conferencing ('VC')/Other Audio- Visual Means ('OAVM') and E-voting information.

The aforesaid advertisements are also being made available on the website of the Company at https://www.aboutbajajfinserv.com/investor-relations-annual-reports.

We request you to kindly take the same on record.

Thanking you.
**FOR BAJAJ FINSERV LIMITED**

UMA OMKAR SHENDE
Digitally signed by UMA OMKAR SHENDE
Date: 2026.07.09 15:16:35 +05'30'

**UMA SHENDE**
**COMPANY SECRETARY**
Email ID: investors@bajajfinserv.in
Encl.: As above



**BAJAJ FINSERV LIMITED**
https://www.aboutbajajfinserv.com/about-us

**Corporate Office:** 6th Floor, Bajaj Finserv Corporate Office, Off Pune - Ahmednagar Road, Viman Nagar, Pune - 411 014, Maharashtra, India
Tel: +91 20 7150 5700 | Fax: +91 20 7150 5792
**Registered Office:** C/o Bajaj Auto Limited Complex, Mumbai - Pune Road, Akurdi, Pune - 411 035, Maharashtra, India
**Corporate ID No.:** L65923PN2007PLC130075 | **Email ID:** investors@bajajfinserv.in

# सीमाप्रश्न बैठकीसाठी पवार अनेक वर्षांनी विधानभवनात

## पक्षाच्या आमदारांचीही घेतली बैठक

**मुंबई, (प्रतिनिधी)** : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बोलावलेल्या महाराष्ट्र-कर्नाटक सीमाप्रश्नाच्या बैठकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरदचंद्र पवार) अध्यक्ष शरद पवार बुधवारी विधानभवनात आले होते. यावेळी त्यांनी पक्षाच्या आमदारांचीही भेट घेतली. २०२० मध्ये राज्यसभेचा उमेदवारी अर्ज भरण्यासाठी पवार विधानभवनात आले होते.

दरम्यान, महाराष्ट्र शासन सीमाभागातील मराठी बांधवांच्या पाठीशी ठामपणे उभे असून त्यांच्या न्याय्य हक्कांसाठी सर्वतोपरी प्रयत्न सुरूच राहतील. सीमाभागातील मराठी बांधवांच्या न्याय्य हक्कांचे संरक्षण करण्यासाठी शासन सर्वतोपरी प्रयत्न करेल, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बैठकीत दिली.

महाराष्ट्र व कर्नाटक सीमाप्रश्नाबाबत उच्चाधिकार समितीची बैठक काल विधानभवनात झाली. या बैठकीला उच्चअधिकार समितीचे सदस्य उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, राज्यसभा सदस्य शरद पवार, लोकसभा सदस्य नारायण राणे, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील, पर्यटन मंत्री शंभूराज देसाई, वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, आमदार जयंत पाटील, आदी उपस्थित होते.

यावेळी देवेंद्र फडणवीस म्हणाले की, सर्वोच्च न्यायालयातील सीमाप्रश्नाची सुनावणी लवकर सुरू व्हावी, यासाठी वरिष्ठ कायदेतज्ज्ञ नेमणार असून कर्नाटकमध्ये मराठी बांधवांवर दाखल करण्यात आलेल्या विविध खटल्यांच्या संदर्भात त्यांना सक्षम कायदेशीर मदत उपलब्ध करून देणार आहे. सीमाभागातील मराठी बांधवांना विविध अडचणींचा सामना करावा लागत असून, संपूर्ण महाराष्ट्र त्यांच्या पाठीशी ठामपणे उभा आहे. समितीने मांडलेल्या सर्व सूचना आणि प्रलंबित मुद्द्यांवर शासन आवश्यक ती कार्यवाही करण्यास तयार आहे. भाषिक अल्पसंख्याकांच्या आयोगाबाबतची सर्व माहिती संकलित करून महाराष्ट्रातील सर्व खासदारांना पाठविण्यात येईल. जेणेकरून, हा विषय संसदेत प्रभावीपणे मांडता येईल, असे त्यांनी सांगितले.

### शिंदे यांच्या दालनात पवार

सीमा प्रश्नाच्या बैठकीनंतर शरद पवार यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या दालनात जाऊन त्यांची सदिच्छा भेट घेतली. दरम्यान, शिंदे मंत्रिमंडळ बैठकीसाठी गेल्यानंतर शिंदे यांच्याच दालनात पवारांनी आपल्या आमदारांची बैठक घेतली. पवारांनी शिंदेंची भेट घेतल्याने, बैठकीसाठी त्यांच्या कार्यालयाचा वापर केल्यामुळे अनेकांच्या भुवया उंचावल्या होत्या. २०२६ च्या राज्यसभा निवडणुकीसाठी शरद पवार यांनी घरूनच उमेदवारी अर्ज दाखल केला. मात्र, २०२० मध्ये ते विधानभवन उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी आले होते. २०१३ मध्ये अजित पवार यांनी उपमुख्यमंत्रि पदाचा राजीनामा दिला तेव्हा स्वतः शरद पवार यांनी विधानभवनात पक्षाच्या आमदारांची बैठक घेतली होती.

# मोशीत कचऱ्याचा ढिगारा इमारतीवर कोसळला

(पान १ वरुन)

या घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दल, एनडीआरएफ, पोलिसआणि महापालिकोच्या अधिकाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली. जेसीबी, पोकलेनसह इतर यंत्रसामग्रीच्या सहाय्याने इमारतीवर कोसळलेल्या कचऱ्याचा ढिगारा हटविण्याचे काम युद्धपातळीवर सुरू करण्यात आले. मात्र, ढिगारा अत्यंत मोठा असल्याने बचावकार्य करताना मोठ्या अडचणी येत होत्या. त्यातच सुरू असलेल्या पावसामुळे मदतकार्यात अडथळे निर्माण होत होते.



दरम्यान, महापौर रवी लांडगे, आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी घटनास्थळी येऊन माहिती घेतली. त्यानंतर बचाव कार्यासाठी लष्कराला पाचारण करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार देहूरोड येथील लष्कराचे २५ जवान घटनास्थळी आले. त्यानंतर बचाव कार्याला वेग आला. इमारतीच्या पहिल्या मजल्यावरील स्लॅबला भगदाड पाडून दोन जवान खाली उतरले.

या जवानांनी आपला जीव धोक्यात घालून सायंकाळी सातच्या सुमारास महिलेसह सात कामगारांना सुरक्षित बाहेर काढले.

दरम्यान, राज्याचे आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन हेही घटनास्थळी दाखल झाले. दुर्घटनेचे नेमके कारण, ढिगाऱ्याखाली अडकलेल्या कामगारांची संख्या याबाबत प्रशासनाकडून माहिती संकलित केली जात असून, बचावकार्य पूर्ण झाल्यानंतरच संपूर्ण चित्र स्पष्ट होणार आहे. या भीषण दुर्घटनेमुळे मोशी परिसरात नागरिकांनी घटनास्थळी मोठी गर्दी केली होती.

# पाकिस्तानी मालवाहू विमान बेपत्ता

## अरबी समुद्रात शोधमोहीम

**कराची** : शारजाहहून कराचीच्या दिशेने येणारे पाकिस्तानचे मालवाहू विमान मंगळवारी रात्री बेपत्ता झाले. विमानात पाच कर्मचारी असून, त्यांच्या सुरक्षिततेबाबत अद्याप कोणतीही अधिकृत माहिती मिळालेली नाही. या घटनेनंतर पाकिस्तानचे नौदल, हवाई दल आणि अन्य यंत्रणांनी तातडीने मोठी शोध आणि बचाव मोहीम हाती घेतली आहे. पाकिस्तान विमानतळ प्राधिकरणाने दिलेल्या माहितीनुसार, मंगळवारी रात्री ९ वाजून १८ मिनिटांनी विमानाचे वैमानिक आणि हवाई वाहतूक नियंत्रण कक्षात (एटीसी) संपर्क झाला होता. यावेळी वैमानिकाने विमानाच्या नेव्हिगेशन यंत्रणेत तांत्रिक बिघाड झाल्याची माहिती दिली.

# माऊलींच्या पालखीचे प्रस्थान

(पान १ वरुन)

नगरप्रदक्षिणा मार्गावर विविध दिंड्यांनी हरिनामाच्या गजरात प्रदक्षिणा घालत सोहळ्यात सहभाग नोंदविला. दुपारी परंपरेनुसार रथापुढील व रथामागील मानाच्या ४७ दिंड्यांतील मर्यादित वारकऱ्यांना मंदिरातील देऊळवाड्यात प्रवेश देण्यात आला. त्यानंतर ११ ब्रह्मवृंदांच्या उपस्थितीत माऊलींच्या समाधीवर वैभवी पोशाख करून आरती झाली. संस्थानतर्फे श्रींच्या चांदीच्या चलपादुकांची वेदमंत्रोच्चारात प्राणप्रतिष्ठा करण्यात आली. यावेळी मानकऱ्यांना पागोटे, दिंडीप्रमुखांना नारळप्रसाद देण्यात आला.

पालखी सोहळ्याचे मालक राजेंद्र आरफळकर आणि बाळासाहेब आरफळकर यांच्या हस्ते चलपादुकांची विधिवत पूजा झाल्यानंतर हरिनामाच्या अखंड गजरात पालखीने मंदिर प्रदक्षिणा केली. त्यानंतर आळंदीकर ग्रामस्थांनी माऊली... माऊली...च्या जयघोषात पालखी खांद्यावर घेत पंढरपूरकडे प्रस्थान केले.

मंदिर प्रदक्षिणेनंतर पालखी गांधी वाड्यातील दर्शनबारी सभागृहात समाजआरतीसाठी विसावली. आळंदीत एक मुक्काम करून आज (गुरुवारी) पालखी पुण्याकडे मार्गस्थ होणार आहे.

# अमेरिकेला इराणकडून प्रत्युत्तर

(पान १ वरुन)

जवळपास १०० दिवस युद्धाचा भडका उडाला होता. त्यानंतर, युद्धविराम आणि सांमजस्य करार करार झाला. तसेच, शांतता करारासाठी ६० दिवसांचा कालावधी निश्चित करण्यात आला. मात्र, आता या सर्वांवर संशयाचे दाट ढग जमा झाले आहेत.

खामेनी यांच्या मृत्यूचा बदला इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू आणि ट्रम्प यांच्या हत्येनंतरच पूर्ण होईल, अशी मागणी इराणमधील नागरिकांकडून केली जात आहे.

अमेरिकेच्या हल्ल्यानंतर इराणच्या संसदेचे अध्यक्ष महमह बागेल गालिबाफ यांनी दडपशाही आणि खंडणीखोरीचा काळ संपला आहे. त्यातून काहीही साध्य होत नाही. आम्ही झुकणार नाही, असा स्पष्ट इशारा 'एक्स' या समाज माध्यमावरील पोस्टद्वारे दिला आहे.

दुसरीकडे, आंतरराष्ट्रीय जलमार्गावरून प्रवास करणाऱ्या आणि निष्पाप नागरिकांचा समावेश असलेल्या व्यापारी जहाजांना लक्ष्य करणाऱ्यांना मोठी किंमत मोजावी लागेल, असे अमेरिकेच्या लष्कराच्या 'सेंट्रल कमांड'ने सांगितले.

**खनिज तेलाचा भडका**

ट्रम्प यांच्या घोषणेनंतर आंतरराष्ट्रीय बाजारात खनिज तेलाचे दर ६.१८ टक्क्यांनी वधारून ७८.७४ अमेरिकन डॉलर्स प्रतिपिंपावर पोहोचले.

# खडकवासला धरण भरले

(पान १ वरुन)

दरम्यान, नदीपात्रातील रस्ता पाण्याखाली गेला असून, नदीपात्राकडे येणारे सर्व रस्ते बॅरिकेड्स लावून वाहतुकीसाठी बंद करण्यात आले आहेत.

मुठा नदीपात्र दुथडी भरून वाहत असून, हे पाणी पाहण्यासाठी पुणेकर राजाराम पूल, गरवारे पूल, लकडी पूल, शिवाजी पुलावर गर्दी करत आहेत. तसेच, भिडे पूल पाहण्यासाठी झेड ब्रीजवर गर्दी करत आहेत. वाहत्या पाण्यात कोणीही उतरू नये, असे आवाहन पाटबंधारे विभाग आणि पोलिसांकडून पहाटेपासूनच करण्यात आले होते. नदीपात्रात लावलेली वाहने काढून घेण्याच्या सूचनाही करण्यात आल्या होत्या. तसेच, पाणी पाहण्यासाठी जिथे गर्दी होईल, अशा ठिकाणी दक्षता म्हणून पोलिस तैनात करण्यात आले होते.

**खडकवासला भरल्याच्या तारखा**

| वर्ष | तारीख |
|---|---|
| २०२२ | १२ जुलै |
| २०२३ | २५ जूलै |
| २०२४ | २४ जुलै |
| २०२५ | १५ जून |
| २०२६ | ०८ जुलै |

**धरण क्षेत्रात २४ तासांत पडलेला पाऊस**

| धरण | पाऊस | टीएमसी | टक्केवारी |
|---|---|---|---|
| खडकवासला | ११३ मिमी | १.९७ | १०० |
| पानशेत | २२१ मिमी | ५.२० | ४५.३६ |
| वरसगाव | २३६ मिमी | ५.८१ | ४५.३६ |
| टेमघर | ३११ मिमी | ०.९८ | २६.५० |
| **एकूण** | **८८१ मिमी** | **१४.९५** | **५१.३०** |

# खंडणी उकळण्याचा प्रयत्न करणाऱ्या पोलिसांसह सहा जणांना अटक

(पान १ वरुन)

त्यानंतर, दोन पोलिस मोटारमध्ये येऊन बसले आणि त्यांना तळेगाव येथे नेले. मात्र, शर्मा आणि त्यांचा मित्र मदतीकरीता पोलिसांशी संपर्क करीत असल्याचे समजल्यावर मोटारीत बसलेले पोलिस उतरून पळून गेले. दरम्यान, पोलिसांचे मदत पथक आले. त्यानंतर त्यांनी कामशेत पोलिस ठाण्यात खंडणीचा गुन्हा दाखल केला. कामशेत पोलिसांनी शोध घेऊन या पोलिसांना अटक केली आहे.

केसरी

**मुद्रितशोधक पाहिजे**

'केसरी'साठी मुद्रितशोधकाची जागा भरावयाची आहे. मराठी, इंग्रजी भाषेचे ज्ञान, मराठी शुद्धलेखनाची माहिती व डीटीपीचे ज्ञान आवश्यक, रात्रपाळीची तयारी. पुरुष उमेदवारांनी अर्जासह भेटावे.

**श्री. सुरज भोंडेकर**

३रा मजला, टिळक वाडा, ५६८, नारायण पेठ,
केसरी कार्यालय, पुणे ४११ ०३० (रविवार सोडून)
**दूरध्वनी** : २४४५९०५१/२४४५९२५०
**ई-मेल** : kesari.hr@gmail.com

जा.क्र./३६९८/२६
दि. ३/७/२०२६

**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, पुणे विभाग पुणे**

**जाहीर नोटीस**

श्री जागेश्वर महादेव मंदिर ट्रस्ट, न्यास नोंदणी क्र. ए/४०४/पुणे, पत्ता १३२/अ, गंज पेठ, नवीन ६५५ गुरुवार पेठ, पुणे ४११००२ या न्यासाच्या विश्वस्त मंडळातील पाच जागांसाठी पुणे शहरातील फक्त रावळ गोसावी समाजातील व्यक्तींमधून नियुक्तीसाठी सहाय्यक धर्मादाय आयुक्त पुणे विभाग, पुणे यांचे समोर किरकोळ अर्ज क्र. ७७/२००९ दाखल केला आहे.

सदर प्रकरणी मे. सहाय्यक धर्मादाय आयुक्त-१ पुणे विभाग, पुणे यांनी दि. ०७/०४/२०२६ रोजी केलेल्या आदेशास अनुसरून ही जाहीर नोटीस देण्यात येते की, श्री जागेश्वर महादेव मंदिर ट्रस्ट न्यास नोंदणी क्र. ए/४०४/पुणे या न्यासाचे योजनेमधील (स्कीममधील) नियमांनुसार पुणे शहरातील फक्त रावळ गोसावी समाजापैकी जागेश्वर महादेवाचे भक्त-उपासक स्त्री-पुरूष व्यक्तींमधून न्यासाचे पाच विश्वस्त नेमण्याचे आहेत.

सबब पुणे शहरातील फक्त रावळ गोसावी समाजापैकी जागेश्वर महादेवाचे भक्त-उपासक स्त्री-पुरुष व्यक्तींना सदरहू न्यासाचे विश्वस्त होण्याची इच्छा असणाऱ्या इच्छुक व्यक्तींनी आपले अर्ज व माहिती परिपत्रक क्र. १४८ च्या नमुन्यामध्ये, तसेच इच्छुक व्यक्ती ही पुणे शहरातील रहिवासी व रावळ गोसावी समाजातील व्यक्ती असल्याचे पुराव्यांसह मे. सहाय्यक धर्मादाय आयुक्त पुणे विभाग, पुणे यांचेकडे ही नोटीस प्रसिध्द झालेपासून तीस (३०) दिवसांचे आत खालील पत्त्यावर दाखल करावेत.

मुदतीनंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा तसेच रावळ गोसावी समाजाव्यतिरिक्त व्यक्तींच्या अर्जांचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

सदरची नोटीस मे. सहाय्यक धर्मादाय आयुक्त-१, पुणे यांचे शिक्क्यानिशी व माझे सहीनिशी आज दिनांक ०२/०७/२०२६ रोजी दिली असे.

शिक्का

**अधीक्षक (न्याय शाखा)**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,**
**पुणे विभाग पुणे**

BAJAJ FINSERV

# बजाज फिनसर्व्ह लिमिटेड

**सीआयएन:** एल६५९२३पीएन२००७पीएलसी१३००७५
**नोंदणीकृत कार्यालय:** बजाज ऑटो लिमिटेड कॉम्प्लेक्स, मुंबई-पुणे रोड, पुणे ४११ ०३५
**संकेतस्थळ:** https://www.aboutbajajfinserv.com/about-us | **ई-मेल आयडी:** investors@bajajfinserv.in
**दूरध्वनी क्र.:** (०२०) ७१५७ ६०६४ | **फॅक्स क्र.:** (०२०) ७१५० ५७९२

**१९व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची आणि ई-मतदानाची सूचना**

**याद्वारे सूचना देण्यात येते** की, बजाज फिनसर्व्ह लिमिटेड ('कंपनी') च्या सदस्यांची १९वी वार्षिक सर्वसाधारण सभा **शुक्रवार, ३१ जुलै २०२६ रोजी दुपारी १२. १५ वाजता (भारतीय प्रमाण वेळेनुसार)** व्हिडिओ कॉन्फरन्सिंग ('व्हि सी')/इतर ऑडिओ-व्हिज्युअल माध्यमे ('ओव्हिएएम') (यापुढे 'ई-एजीएम' असे संबोधले जाईल) द्वारे, सदस्यांची कोणत्याही सामायिक स्थळी प्रत्यक्ष उपस्थिती न ठेवता, कंपनी अधिनियम, २०१३ ('कायदा') आणि त्याअंतर्गत तयार केलेल्या नियमांच्या लागू तरतुदी, कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयाने ('एमसीए') जारी केलेले २२ सप्टेंबर २०२५ रोजीचे सर्वसाधारण परिपत्र क्र. ०३/२०२५ आणि सेबी लिस्टिंग रेग्युलेशन्स, २०१५ यांच्या अनुपालनात आयोजित करण्यात आली आहे, ज्यामध्ये ई-एजीएम च्या सूचनेत नमूद करण्यात आलेले व्यवसाय विचारात घेतले जातील.

सदर परिपत्राच्या अनुपालनात, कंपनीने ई-एजीएमची सूचना आणि आर्थिक वर्ष २०२६ साठीचा वार्षिक अहवाल, ज्यामध्ये बिझनेस रिस्पॉन्सिबिलिटी अँड सस्टेनेबिलिटी रिपोर्ट ('बीआरएसआर') समाविष्ट आहे (यापुढे 'अहवाल/दस्तऐवज' असे संबोधले जाईल), बुधवार, ८ जुलै २०२६ रोजी त्या सदस्यांना इलेक्ट्रॉनिक माध्यमातून पाठवला आहे, ज्यांच्याकडे शुक्रवार, २६ जून २०२६ रोजी (अहवाल पाठविण्याच्या उद्देशाने कट-ऑफ तारीख) समभाग होते आणि ज्यांचे ई-मेल पत्ते कंपनी/इश्यू आणि शेअर ट्रान्सफर एजंटचे रजिस्ट्रार म्हणजेच केफिन टेक्नॉलॉजीज लिमिटेड ('केफिन')/डिपॉझिटरी पार्टिसिपंट(स्) ('डीपी') यांच्याकडे नोंदणीकृत आहेत.

सेबी लिस्टिंग रेग्युलेशन्सच्या तरतुदींनुसार, वर नमूद केलेले/दस्तऐवज पाहण्यासाठी वेब-लिंक आणि क्यू आर कोड तसेच अचूक मार्ग आणि रिमोट ई-मतदानासाठी लॉग-इन तपशील असलेले पत्र, ज्या सदस्यांनी आपला ई-मेल पत्ते नोंदणीकृत केलेले नाही अशा सदस्यांना पाठवले आहे.

वरील अहवाल खाली नमूद केलेल्या संकेतस्थळांवर उपलब्ध करून दिले जात आहेत:

| | | |
|---|---|---|
| कंपनी | https://www.aboutbajajfinserv.com/investor-relations-annual-reports | |
| स्टॉक एक्सचेंज | बीएसई लिमिटेड | नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेड |
| | https://www.bseindia.com/ | https://www.nseindia.com/ |
| केफिन (ई-मतदान सेवा प्रदाता म्हणून) | https://evoting.kfintech.com/public/Downloads.aspx | |

कायद्याच्या कलम १०८ आणि कंपनी (व्यवस्थापन आणि प्रशासन) नियम, २०१४ च्या नियम २० मधील सुधारित तरतुदी आणि सेबी लिस्टिंग रेग्युलेशन्सचा नियम ४४ यानुसार, सदस्यांना पुढीलप्रमाणे सूचना देण्यात येते:

अ) ई-एजीएमच्या सूचनेत नमूद ठरावांवर इलेक्ट्रॉनिक माध्यमातून मतदान करता यावे यासाठी कंपनी आपल्या सदस्यांना ई-मतदान सुविधा उपलब्ध करून देत आहे. ई-एजीएमसाठी केफिन यांची ई-मतदान सेवा प्रदाता म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

ब) ई-एजीएमच्या सूचनेत नमूद ठरावांवर व्यवहार रिमोट ई-मतदान किंवा ई-एजीएममधील ई-मतदानाद्वारे केले जाऊ शकतात.

स) रिमोट ई-मतदान **सोमवार, २७ जुलै २०२६ रोजी (सकाळी ९. ०० वाजता, भारतीय प्रमाण वेळेनुसार)** सुरू होईल आणि **गुरुवार, ३० जुलै २०२६ रोजी (सायंकाळी ५. ०० वाजता, भारतीय प्रमाण वेळेनुसार)** समाप्त होईल. गुरुवार, ३० जुलै २०२६ रोजी सायंकाळी ५. ०० वाजेनंतर (भारतीय प्रमाण वेळेनुसार) रिमोट ई-मतदानास परवानगी दिली जाणार नाही.

ड) ई-मतदानाच्या उद्देशासाठी कट-ऑफ तारीख **शुक्रवार, २४ जुलै २०२६** ('कट-ऑफ तारीख') असेल.

ई) सूचना पाठवल्यानंतर शेअर्स घेतलेले आणि कंपनीचे सदस्य झालेले तसेच वर नमूद कट-ऑफ तारखेनुसार पात्र सदस्य असलेले व्यक्ती, आपल्या नोंदणीकृत ई-मेल आयडीवरून **evoting@kfintech.com** येथे विनंती पाठवून केफिनकडून युझर आयडी आणि पासवर्ड मिळवू शकतात. ज्या सदस्यांनी आपला ई-मेल आयडी नोंदणीकृत केलेला नाही, त्यांनी तो अद्ययावत करण्यासाठी आपल्या संबंधित डीपी/केफिन/कंपनीशी संपर्क साधावा.

फ) ज्या सदस्यांनी आपले ई-मेल पत्ते नोंदणीकृत केले आहेत त्यांना रिमोट ई-मतदानासाठी युझर आयडी आणि पासवर्ड ई-मेलद्वारे कळवले जातात. ज्या सदस्यांचे ई-मेल पत्ते कंपनी/केफिन/डीपी कडे नोंदणीकृत नाहीत, त्यांना पाठवलेल्या पत्रावर युझर आयडी आणि पासवर्ड छापलेले आहेत.

ग) सभेत उपस्थित असलेले आणि रिमोट ई-मतदानाद्वारे ठरावांवर मतदान न केलेले तसेच तसे करण्यास अन्यथा प्रतिबंध नसलेले सदस्य, ई- एजीएममध्ये ई- मतदान प्रणालीद्वारे मतदान करण्यास पात्र असतील. ई-एजीएममध्ये मतदान करण्याच्या सूचना ई-एजीएमच्या सूचनेत दिलेल्या आहेत.

ह) रिमोट ई-मतदानाद्वारे मतदान केलेले सदस्य ई-एजीएममध्ये उपस्थित राहू/सहभागी होऊ शकतात; मात्र त्यांना ई-एजीएममध्ये पुन्हा मतदान करता येणार नाही.

इ) ज्या व्यक्तीचे नाव कट-ऑफ तारखेला सदस्य नोंदवहीत किंवा डिपॉझिटरी कडील लाभार्थी मालकांच्या नोंदवहीत नोंदलेले असेल, त्यांनाच रिमोट ई-मतदान तसेच ई-एजीएममधील ई-मतदान सुविधेचा लाभ घेण्याचा अधिकार असेल. सदस्यांचे मतदानाचे अधिकार कंपनीच्या पेड-अप इक्विटी शेअर कॅपिटलमध्ये त्यांच्या नावावर असलेल्या इक्विटी शेअर्सच्या प्रमाणात असतील.

ज) ई-मतदानाशी संबंधित कोणतेही प्रश्न/तक्रारी असल्यास, सदस्य **https://evoting.kfintech.com** येथे उपलब्ध वारंवार विचारले जाणारे प्रश्न ('FAQs') आणि ई-मतदान वापरकर्ता पुस्तिका पाहू शकतात.

तसेच, ई-मतदानाशी संबंधित तक्रारींचे निराकरण करण्यासाठी सदस्य खाली नमूद तपशीलांवर संपर्क साधू शकतात:

| | |
|---|---|
| **मोहम्मद मोहसिनुद्दीन**<br>सहाय्यक उपाध्यक्ष - कॉर्पोरेट रजिस्ट्री<br>केफिन टेक्नॉलॉजीज लिमिटेड<br>युनिट: बजाज फिनसर्व्ह लिमिटेड<br>सेलेनियम बिल्डिंग, टॉवर-बी, प्लॉट क्र. ३१ आणि ३२,<br>फायनान्शियल डिस्ट्रिक्ट, नानकरामगुडा,<br>सेरिलिंगमपल्ली, हैदराबाद, रंगारेड्डी,<br>तेलंगणा - ५०० ०३२<br>ई-मेल आयडी: einward.ris@kfintech.com<br>टोल फ्री क्र.: १८०० ३०९ ४००१ | **उमा शेंडे**<br>कंपनी सचिव<br>बजाज फिनसर्व्ह लिमिटेड<br>३रा मजला, पंचशील टेक पार्क,<br>विमान नगर, पुणे - ४११०१४<br>ई-मेल आयडी: investors@bajajfinserv.in<br>दूरध्वनी क्र.: (०२०) ७१५७ ६०६४ |

क) डीमॅट स्वरूपात शेअर्स धारण करणारे वैयक्तिक शेअरहोल्डर्स, डिपॉझिटरी(ज) (म्हणजे एनएसडीएल आणि सीडीएसएल) मार्फत ई-मतदानाशी संबंधित कोणत्याही समस्यांसाठी खालील तपशीलांवर संपर्क साधू शकतात:

| एनएसडीएल | सीडीएसएल |
|---|---|
| ई-मेल आयडी: evoting@nsdl.co.in<br>टोल फ्री क्रमांक: ०२२ ४८८६ ७०००<br>/ ०२२ २४९९ ७००० | ई-मेल आयडी: helpdesk.evoting@cdslindia.com<br>टोल फ्री क्रमांक: १८०० २२ ५५ ३३ |

रिमोट ई-मतदान आणि ई-एजीएममधील ई-मतदानाबाबत अधिक तपशीलांसाठी सदस्यांनी ई-एजीएमची सूचना पाहावी.

संचालक मंडळाने ३० एप्रिल २०२६ रोजी झालेल्या बैठकीत प्रत्येकी ₹१ दर्शनी मूल्याच्या प्रत्येक इक्विटी शेअरवर ₹१.५ (१५०%) लाभांश देण्याची शिफारस केली आहे. कायद्याच्या कलम १२६ मधील तरतुदींच्या अधीन राहून, एजीएममध्ये घोषित झाल्यास, इक्विटी शेअर्सवरील लाभांश मंगळवार, ३० जून २०२६ रोजी शेअर्स धारण करणाऱ्या सर्व सदस्यांना मंगळवार, ४ ऑगस्ट २०२६ रोजी किंवा त्याच्या आसपास जमा केला जाईल.

सेबी लिस्टिंग रेग्युलेशन्सच्या नियम १२ मधील अलीकडील सुधारणेनुसार, वर नमूद नियमांनुसार कंपनीला लाभांश फक्त इलेक्ट्रॉनिक माध्यमातूनच अदा करणे बंधनकारक आहे. त्यानुसार, सदस्यांनी नोंद घ्यावी की लाभांश अदा करण्यासाठी कंपनीकडून प्रत्यक्ष स्वरूपातील डिव्हिडंड वॉरंट्स, डिमांड ड्राफ्ट्स किंवा चेक्स यापुढे जारी केले जाणार नाहीत.

त्यामुळे, सदस्यांनी आपले बँक खाते तपशील आपल्या डिपॉझिटरी पार्टिसिपंटकडे (डीमॅट स्वरूपात धारण केलेल्या शेअर्ससाठी) किंवा कंपनी/केफिन कडे (प्रत्यक्ष स्वरूपात धारण केलेल्या शेअर्ससाठी) अद्ययावत करण्याची विनंती करण्यात येते.

**बजाज फिनसर्व्ह लिमिटेडसाठी**
स्वाक्षरी/-
**उमा शेंडे**
**कंपनी सचिव**

**ठिकाण: पुणे**
**तारीख: ८ जुलै २०२६**